पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.स्थायी समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – ८९**
(सभावृत्तांत)

**दिनांक – १३/११/२०१८** **वेळ – दुपारी ०२.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक १३/११/२०१८ रोजी दुपारी ०२.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड - सभापती
२. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३. मा.राजू मिसाळ
४. मा.गावडे राजेंद्र तानाजी
५. मा.आंगोळकर सागर सुनिल
६. मा.करुणा शेखर चिंचवडे
७. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
८. मा.गीता सुशिल मंचरकर
९. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१०. मा.बारणे अर्चना तानाजी

याशिवाय मा.पाटील - अतिरिक्त आयुक्त(१), मा.गावडे – प्र.अतिरिक्त आयुक्त(२) मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.चव्हाण - शहर अभियंता, मा.डॉ.रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर – उपसंचालक नगररचना, मा.कोळंबे – मुख्य लेखापाल, मा.तुपे - सह शहर अभियंता, मा.निकम, मा.सवणे – प्र.सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.खोराटे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.झगडे, मा.खोत - सहाय्यक आयुक्त, मा.बोदडे, मा.दांगट,– प्र. सहाय्यक आयुक्त, मा.साळुंके – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.मुंडे प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग) मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.इंगळे, मा.चव्हाण, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.घोडे, मा.कांबळे, मा.गट्टुवार, मा.पुजारी, मा.भोसले, मा.मोरे, मा.पाटील, मा.घुबे, मा.पवार, मा.सुपेकर, मा.धोनोरकर, मा.सेठीया, मा.फुटाणे - कार्यकारी अभियंता,

मा.डॉ.दगडे – पशुवैद्यकिय अधिकारी, मा.जगताप – कामगार कल्याण अधिकारी, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, मा.माने – लेखाधिकारी, पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते व संसदीय कार्यमंत्री मा.अनंत कुमार व जेष्ठ अभिनेत्री लालन सारंग यांचे दि.१२/११/२०१८ रोजी दु:खद निधन झालेने त्यांना आजच्या सभेत श्रध्दांजली वाहण्यात यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.३४) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ ड नुसार अवलोकनार्थ ठेवावयाच्या विकास कामांबाबत.

विषय क्र.३५) मा.स्थायी समिती ठराव क्र.३२३६ दि.२५/०९/२०१८ अन्वये झालेल्या ठरावामधील सल्लागारांचे नाव दुरूस्तीबाबत - मा.विलास मडिगेरी, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३६) संविधान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमासाठी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत. – मा.सागर आंगोळकर, मा.विकास डोळस यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३७) मा.स्थायी समिती ठराव क्र.३१०२ दि.२९/०८/२०१८ मध्ये दुरूस्तीबाबत. - मा.विलास मडिगेरी, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३८) मा.स्थायी समिती ठराव क्र.३५५८ दि.३०/११/२०१८ मध्ये दुरूस्तीबाबत. - मा.विलास मडिगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३९) मा.स्थायी समिती ठराव क्र.३६०१ दि.०५/११/२०१८ रद्द करणेबाबत. - मा.विलास मडिगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४०) मा.स्थायी समिती सभा आयोजनाबाबत - मा.विलास मडिगेरी, मा.विकास डोळस यांचा प्रस्ताव.

दिनांक ०५/११/२०१८ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ८८)** चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - ३६०९ | विषय क्रमांक - ०१

दिनांक – १३/११/२०१८ | विभाग – क्रीडा

सूचक – मा.राजेंद्र गावडे | अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.अंबरनाथ कांबळे, मा.संजय वाबळे यांचा प्रस्ताव –

विषय - मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.५३ दि.१२/१०/२०१८

विषय क्र.१ चा विचार दि.०४/१२/२०१८ चे सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६१० | विषय क्रमांक - ०२

दिनांक – १३/११/२०१८ | विभाग – स्थापत्य ब मुख्यालय

सूचक – मा.विलास मडिगेरी | अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/नि/२-ब/४४३/२०१८ दि.१९/१०/२०१८

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.22/8/2018-19 अन्वये सन २०१८-१९ करीता प्रभाग क्र.१७ मधील मनपा महानगरपालिका इमारतींची दुरुस्ती करणेकामी मे.रेणूका कंन्स्ट्रक्शन नि.र.रू.50,11,810/- (अक्षरी र.रु.पन्नास लाख अकरा हजार आठशे दहा फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.49,04,075/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार विषयांकित काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.49,04,075/- पेक्षा 32.97% कमी म्हणजेच र.रु.32,87,201/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.23,985/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.83,750/- = एकुण र.रु.33,94,936/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६११ विषय क्रमांक - ०३
दिनांक – १३/११/२०१८ विभाग – स्थापत्य क/ह मुख्यालय
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचेकडील पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/३९९/२०१८ दि.१९/१०/२०१८

विषय - प्रभाग क्र.८ सेक्टर नं.१ हॉटेल हवेली मागील परिसरात व इत्यादी ठिकाणी फुटपाथ करुन कलर पेव्हीग ब्लॉक बसविणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेबाबत.

विषय क्र.३ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६१२ विषय क्रमांक - ०४
दिनांक – १३/११/२०१८ विभाग – स्थापत्य ब मुख्यालय
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचेकडील पत्र क्र.स्था/नि/२-ब/४५८/२०१८ दि.२३/१०/२०१८

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.३३/२/२०१८-१९ अन्वये प्र.क्र.१९ वाल्हेकरवाडी मधील विविध ठिकाणी देखभाल दुरुस्ती सुधारणा व स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.पी.जी कंन्स्ट्रक्शन नि.र.रू.४४,९९,७७७/-(अक्षरी र.रु. चव्वेचाळीस लाख नव्याण्णव हजार सातशे सत्याहत्तर फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.४१,६८,५६४/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.४१,६८,५६४/- पेक्षा २९.००% कमी म्हणजेच र.रु.२९,५९,६८०/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.१,४१३/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.३,२९,८००/- = एकुण र.रु.३२,९०,८९३/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६१३ विषय क्रमांक - ०५

दिनांक – १३/११/२०१८ विभाग – नगररचना व विकास

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि/८/३१९/२०१८ दि.२५/१०/२०१८

विषय - पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे मंजुर व पिंपरी चिंचवड महानगरपालिका नियोजन नियंत्रणाखाली समाविष्ठ झालेल्या मंजुर विकास योजनेतील क्षेत्र भुसंपादनाने ताब्यात घेणेबाबत.

विषय क्र.५ चा विचार दि.०४/१२/२०१८ चे सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६१४ विषय क्रमांक - ०६

दिनांक – १३/११/२०१८ विभाग – लेखा

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.लेखा/३/कावि/३०३/२०१८ दि.२५/१०/२०१८

विषय - पी.एम.पी.एम.एल चे बसेसमधून दर महिन्यातून १ दिवस मोफत प्रवासाबाबत व त्यापोटी येणारा तूटीचा अर्थिकभार महानगरपालिकेमार्फत उचलणेबाबत.

विषय क्र.६ चा विचार दि.०४/१२/२०१८ चे सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६१५ विषय क्रमांक - ०७

दिनांक – १३/११/२०१८ विभाग – क्रीडा

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.क्रीडा/३/कावि/३०९/२०१८ दि.०६/१०/२०१८

विषय - मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.५६ दि.२६/१०/२०१८.

विषय क्र.७ चा विचार दि.०४/१२/२०१८ चे सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६१६ विषय क्रमांक - ०८

दिनांक – १३/११/२०१८ विभाग – जलनि:सारण मुख्यालय

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचेकडील पत्र क्र.जनि/२/कावि/१७५७/२०१८ दि.२९/१०/२०१८

विषय - 'ग' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र.२३ थेरगाव मध्ये ड्रेनेज लाईन व चेंबर्सची देखभाल दुरुस्ती व इतर आकस्मितपणे उद्भवणारी जलनिःसारण विषयक कामे करणेबाबत.

विषय क्र.८ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६१७ विषय क्रमांक - ०९

दिनांक – १३/११/२०१८ विभाग – स्थापत्य इ मुख्यालय

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचेकडील पत्र क्र.स्था/नि/इ-मुख्य/१६२/२०१८ दि.२९/१०/२०१८

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.37/8/2018-19 अन्वये प्रभाग क्र.४ दिघी-बोपखेल येथील विविध ठिकाणचे चरांची व डांबरी रस्त्यांची दुरुस्तीकरणेकामी मे.बहिरट ब्रदर्स नि.र.रू.41,72,527/- (अक्षरी र.रू.एक्केचाळीस लाख बहात्तर हजार पाचशे सत्तावीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.41,08,727/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार विषयांकित काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.41,08,727/- पेक्षा 24.10% कमी म्हणजेच र.रु.31,18,524/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.0/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.63,800/- = एकुण र.रु.31,82,324/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६१८ विषय क्रमांक - १०
दिनांक – १३/११/२०१८ विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार, वैद्य
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.मसाभां/५/कावि/४६८/२०१८ दि.३०/१०/२०१८

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपरीनगर येथील डिझेल शवदाहिनी चालविणे व निगा देखभाल राखणेकामी मे.अर्जुन आधार महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांचेकडून ई-निविदा नोटीसला प्राप्त झालेल्या लघुत्तम (कमी करुन दिलेल्या) दरानुसार र.रु.८७,९५०/- डिझेल सहीत प्रतिमहा देणेकामी तसेच त्यांचे समवेत करारनामा करुन व अनामत रक्कम घेवून आदेशाच्या तारखे पासून तीन वर्ष काम देण्यास व येणा-या र.रु.३१,६६,२००/- (अक्षरी र.रू.एकतीस लाख सहासष्ट हजार दोनशे फक्त) खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६१९ विषय क्रमांक - ११
दिनांक – १३/११/२०१८ विभाग – जलनि:सारण मुख्यालय
सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचेकडील पत्र क्र.जनि/२/कावि/१७८९/२०१८ दि.३१/१०/२०१८

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.3/48/2018-19 अन्वये च-होली मैलाशुध्दिकरण केंद्रातर्गत प्रभाग क्र.१ चिखली व शेलारवास्ती, सोनावणेवस्ती परीसरात आवश्यकतेनुसार भुयारी गटर नलिका टाकणे कामी मे.प्रविण कन्स्ट्रक्शन नि.र.रू.37,49,643/- (अक्षरी र.रु.सदतीस लाख एकोणपन्नास हजार सहाशे त्रेचाळीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.37,49,601/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार विषयांकित काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.37,49,601/- पेक्षा 27.09% कमी म्हणजेच र.रु.27,33,834/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.42/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.27,33,876/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - ३६२० विषय क्रमांक - १२

दिनांक – १३/११/२०१८ विभाग – ब क्षेत्रीय, आरोग्य

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचेकडील पत्र क्र.बक्षेआ/५/कावि/६६७/२०१८ दि.३१/१०/२०१८

विषय - निविदा नोटीस क्र.३/२०१५-१६ नुसार अतिरिक्त १ वाहनांसाठीच्या येणा-या खर्चाबाबत.

विषय क्र.१२ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६२१ विषय क्रमांक - १३

दिनांक – १३/११/२०१८ विभाग – स्थापत्य ड/ग मुख्यालय

सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचेकडील पत्र क्र.स्था/नि/ड-मुख्य/४४१/२०१८ दि.०१/११/२०१८

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.32-18-2018-19 अन्वये नविन प्रभाग क्र.२७ येथील रहाटणी येथील नखाते नगर रहाटणी फाटा व प्रभागातील व परिसरातील रस्त्यांचे डांबरीकरण करणेकामी मे.बहिरट ब्रदर्स नि.र.रू.33,82,559/- (अक्षरी र.रु.तेहतीस लाख ब्याऐंशी हजार पाचशे एकोणसाठ फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.33,19,909/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार विषयांकित काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.33,19,909/- पेक्षा 17.51% कमी म्हणजेच र.रु.27,38,593/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.0/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.62,650/- = एकुण र.रु.28,01,243/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६२२ विषय क्रमांक - १४
दिनांक – १३/११/२०१८ विभाग – क क्षेत्रीय
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.कक्षेका/आ१५/कावि/४४९/२०१८ दि.०१/११/२०१८

मा.क्षेत्रीय अधिकारी यांचीशिफारस विचारात घेवून –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील नागरिकांना डेंग्यू, मलेरिया, चिकून गुण्या या आजाराची लागण होऊ नये म्हणुन प्रतिबंधात्मक उपाय म्हणुन औष्णिक धुरिकरण करणेकामी डिझेलवर चालणारे दोन तीन चाकी रिक्षा टेम्पो भाड्याने घेणेकामी निविदा नोटीस (ई टेंडरिंग पध्दतीने) क्रं.२/२०१७-२०१८ प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर निविदा दिं.२१/०६/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता उघडण्यात आली असता. मे.श्री.संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था यांचा दर कमी असल्याने त्यानुसार कमी दरधारक संस्था यांना पत्र पाठवून किती दर प्रति दिन प्रति रिक्षा कमी करणार याबाबत इकडिल पत्र क्र.कक्षे/आ१५ /कावि/६३५/२०१७ दि.२२/०६/२०१७ अन्वये दर कमी करून देणेबाबत पत्र दिले असता त्याचेकडील दि.२८/०६/२०१७ चे पत्रान्वये प्रतिदिन प्रति टेम्पो दर र.रू.५८८.४८ या दराने काम करणेस तयार असलेची तयारी दाखवली असुन सोबत रिक्षा भाडयाने घेतलेची कागदपत्रे सादर केली आहे तसेच पत्र क्र. कक्षे/आ१५/कावि/८०७/१७ दि.२४/०८/२०१७ अन्वये मा.स्थायी समितीपुढे विषय पत्र ठेवून मा.स्थायी समिति ठराव क्र.८९४ दि.६/०९/२०१७चे ठराव अनव्ये मान्यता घेणेत आली आहे. त्या नुसार आदेश क्र.कक्षे/आ१५/कावि/७८०/२०१७, दि.०१/०९/२०१७ अन्वये मे.श्री.संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था यांना दि.२४/०८/२०१७ ते दि.२३/०८/२०१८ अखेर १२ महिन्यांपर्यंत अथवा पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंतच्या कालावधीसाठीचा आदेश देणेत आलेला आहे. तसेच संस्थेने म.न.पा. बरोबर दि.२४/०८/२०१७ रोजी केलेला सील करारनामा कार्यालयाकडे सादर केलेला आहे. परंतू सद्यस्थितीत म.न.पा. मार्फत नविन (NIC) निविदा प्रणाली कार्यान्वीत करणेची प्रक्रिया चालू असल्याने सदर निविदा (NIC) निविदा प्रणालीत प्रसिध्द करणेकामी काही कालावधी लागणार असल्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील नागरिकांना डेंग्यू, मलेरिया, चिकून गुण्या या आजाराची लागण होऊ नये म्हणुन प्रतिबंधात्मक उपाय म्हणुन औष्णिक धुरिकरण करणे या कामाचा ठेका मिळालेले ठेकेदार मे.श्री. संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था यांना दि.२४/०८/२०१८ पासून ०३ महिने किंवा निविदा नोटीस कार्यवाही पुर्ण होवून आदेश होईपर्यंत कालावधीसाठी प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले असले तरी प्रस्तुत विषयातील कामासाठी मे.श्री.संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था यांचे कडून क क्षेत्रीय कार्यक्षेत्रात औष्णिक धुरीकरण करणेकामी डिझेलवर चालणारे २ (दोन) तीन चाकी रिक्षा टेंम्पो प्रति दिन प्रति टेंम्पो दर र.रू.५८८.४८ दराने दि.२४/०८/२०१८ ते दि.२३/११/२०१८ अखेर

पर्यंत उपलब्ध करून घेवून त्या उपलब्ध वाहानांचा वाढीव खर्च ३ महिन्यांकरिता र.रू.१,३७,७०४.३२ = र.रू.१,३७,७०४ (अक्षरी र.रू. एक लाख सदोतीस हजार सातशे चार फक्त) खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६२३ विषय क्रमांक - १५
दिनांक – १३/११/२०१८ विभाग – मुख्य लेखा परिक्षण
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचेकडील पत्र क्र.मुलेप/१/कावि/११०७/२०१८ दि.०१/११/२०१८

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मुख्य लेखा परिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावात नमूदप्रमाणे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६२४ विषय क्रमांक - १६
दिनांक – १३/११/२०१८ विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पापु/६/कावि/२४५/२०१८ दि.०२/११/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पाणीपुरवठा विभागाकडील ई-निविदा क्र.२/२/२०१८-१९ अन्वये जलशुद्धीकरण केंद्र से.२३ करीता ३६५ मे.टन द्रवरूप पॉली ॲल्युमिनियम क्लोराईड खरेदीकामी वृत्तपत्र तसेच मनपा वेबसाईटवर निविदा नोटीस प्रसिद्ध करून निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा अटी व शर्तीनुसार पात्र असलेल्या ०३ निविदा दि.२५/०६/२०१८ रोजी निविदा समितीपुढे उघडल्या असून मे.एस.व्ही.एस.केमिकल कॉर्पोरेशन यांची र.रू.३१,७००/- प्र.मे.टनदराची निविदा लघुत्तम निविदा आहे. जलशुद्धीकरणाचे प्रक्रियेमध्ये पावडर पॉली ॲल्युमिनियम क्लोराईड हा घटक अत्यंत महत्वाचा असून त्याचा पुरवठा न चुकता अखंडीतपणे जलशुद्धीकरण केंद्रास होणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा त्याचा शहरातील पाणीपुरवठ्यावर परिणाम होवू शकतो. यासाठी सदर पुरवठ्याकामी एकावेळी २ एजन्सीज मनपाचे हाताशी असने गरजेचे असलेने सदर निविदेतील शर्त क्र. १२ नुसार सदरची खरेदी ६०:४० या प्रमाणात म्हणजेच 1st Lowest ठेकेदाराकडून एकूण परिमाणाच्या ६०% व 2nd Lowest ठेकेदाराकडून एकूण परिमाणाच्या ४०% परिमाण 1st

Lowest ठेकेदाराच्या दराने खरेदी करावयाचे आहे. तरी, 1st Lowest ठेकेदार मे.एस.व्ही.एस. केमिकल कॉर्पोरेशन यांचेकडून एकूण परिमाणाच्या ६०% परिमाण म्हणजेच २१९ मे. टन पावडर पॉली ॲल्युमिनियम क्लोराईड र.रु.३१,७००/- प्र.मे. टन दराने (एकूण खर्च र.रू.६९,४२,३००/-) दराने खरेदी करणेस मा.आयुक्त व मा स्थायी समिती यांनी मंजूरी दिलेली आहे. व उर्वरित ४०% पुरवठा करणेसाठी निविदा शर्त क्र.१२ नुसार ठेकेदार मे.आयडिअल केमिकल (इं) प्रा.लि. यांना आपण 1st Lowest ठेकेदाराच्या दराने म्हणजेच र.रु.३१,७००/- प्र. मे. टन दराने पुरवठा करणेस तयार आहात का ?याबाबत पत्राद्वारे विचारणा केली असता त्यांनी दि.२१/०९/२०१८ चे पत्रान्वये र.रु.३१,७००/- प्र. मे. टन दराने पावडर पॉली ॲल्युमिनियम क्लोराईडचा पुरवठा करणेस तयार असलेबाबत कळविलेले आहे. तरी, 2nd Lowest ठेकेदार मे.आयडिअल केमिकल (इं) प्रा.लि. यांचेकडून ४०% परिमाण म्हणजेच १४६.०० मे.टन पावडर पॉली ॲल्युमिनियम क्लोराईड 1st Lowest ठेकेदाराच्या दराने म्हणजेच र.रू.३१,७००/- प्र.मे.टन ( निविदा स्विकृती योग्य दरापेक्षा १.७६ % ने जादा ) या दराने खरेदी करणेसाठी त्यांच्याशी करारनामा करणेस व याकामी येणारा एकूण खर्च र.रू.४६,२८,२००/- (अक्षरी र.रू.शेहेचाळीस लाख अठ्ठावीस हजार दोनशे फक्त) मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६२५ | विषय क्रमांक - १७

दिनांक – १३/११/२०१८ | विभाग – जलनि:सारण मुख्यालय

सूचक – मा.विलास मडिगेरी | अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचेकडील पत्र क्र.जनि/२/कावि/१८३७/२०१८ दि.०२/११/२०१८

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.3/73/2018-19 अन्वये ब क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत प्र.क्र.१७ मध्येवार्षिक ठेकेदारी पद्धतीने ड्रेनेज लाईन व चेंबर्सची देखभाल दुरुस्ती करणेकामी मे मनिष असोसिएट नि.र.रू.29,99,997/- (अक्षरी र.रु.एकोणतीस लाख नव्याण्णव हजार नऊशे सत्यानण्णव फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.29,99,782/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.29,99,782/- पेक्षा 26.07% कमी म्हणजेच र.रु.22,17,739/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.215/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.22,17,954/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार

फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६२६ विषय क्रमांक - १८

दिनांक – १३/११/२०१८ विभाग – विद्युत/यांत्रिकी

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ –मा.सह शहर अभियंता (वि/यां) यांचेकडील पत्र क्र.वि.मुका/५/कावि/५२१/२०१८ दि.०१/११/२०१८

मा.सह शहर अभियंता (वि/यां) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील सोबतचे प्रपत्र अ 1 मधिल निविदा कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६२७ विषय क्रमांक - १९

दिनांक – १३/११/२०१८ विभाग – मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.सहा.आयुक्त, भांडार यांचेकडील पत्र क्र.मभा/१५/कावि/१०९/२०१८ दि.०१/११/२०१८

मा.सहा.आयुक्त, भांडार यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभाग यांचेसाठी आवश्यक साहित्य खरेदीसाठी ई निविदा सुचना क्र.०४/२०१७-१८ नुसार मे.पी शेषाद्री & कंपनी पुणे १९ यांचे र.रु.९,०१,४५०/- व मे.कापसे एंटरप्रायजेस पिंपरी, पुणे १७ यांचे र.रु.१४,१९०/- हे लघुत्तम दर प्राप्त झालेले असुन सदरचे दर स्विकृत करणेत आलेले आहेत. त्यानुसार मे. पी शेषाद्री& कंपनी व मे. कापसे एंटरप्रायजेस यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आलेला असून पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला आहे. तरी सदर साहित्याच्या खरेदीसाठी येणा-या र.रु.९,१५,६४०/- (अक्षरी र.रू.नऊ लाख पंधरा हजार सहाशे चाळीस फक्त) खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६२८ विषय क्रमांक - २०
दिनांक – १३/११/२०१८ विभाग – स्थापत्य क मुख्यालय
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विलास मडिगेरी
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/५११/२०१८ दि.०२/११/२०१८

विषय - क प्रभागात विविध सेवा वाहिन्यांसाठी खोदलेल्या रस्त्यांचे चर बुजविणेबाबत.

विषय क्र.२० चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६२९ विषय क्रमांक - २१
दिनांक – १३/११/२०१८ विभाग – आरोग्य
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ –मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.आमुका/०३/कावि/८४४/२०१८ दि.०२/११/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

आरोग्य मुख्य कार्यालयाकडील घनकचरा व्यवस्थापन या लेखाशिर्षावर उपलब्ध तरतुदीमधील तरतूद स्मशानभूमी केअर टेकर या लेखाशिर्षावर र.रु.१,८२,००,०००/- तसेच आरोग्य विषयक शासकीय योजनांची अंमलबजावणी व आरोग्य विषयक जनजागृती या लेखाशिर्षावर र.रु.६५,००,०००/- याप्रमाणे वर्गीकरण प्रस्तावित केलेनुसार एकूण र.रु.२,४७,००,०००/- (अक्षरी र.रू.दोन कोटी सत्तेचाळीस लाख फक्त) प्रस्तावात नमूद तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू.२,४७,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६३० विषय क्रमांक - २२
दिनांक – १३/११/२०१८ विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचेकडील पत्र क्र.पअक/१/कावि/२८०/२०१८ दि.०३/११/२०१८

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.ENV1/1-2018-19 अन्वये मोशी कचरा डेपो येथे रसायणे खरेदी व यांत्रिकी पध्दतीने रसायणे फवारणी करणेकामी मे.जी केमिकल्स वर्क्स यांचेकडुन नि.र.रु.२४,७४,०६३/-(अक्षरी र.रू. चौवीस लाख चौ-याहत्तर हजार त्रेसष्ठ फक्त) पेक्षा

-९.००% कमी या दरानेकाम करुन घेणे व नियमानुसार निविदेतील अटी प्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर वेगळा अदा करणेस या अटीस अधिन राहून त्यांचेसोबत करारनामा करुन कामाचे आदेश देण्यात आले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६३१ विषय क्रमांक - २३
दिनांक – १३/११/२०१८ विभाग – विद्युत मुख्यालय
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विलास मडिगेरी
संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचेकडील पत्र क्र.विमुका/५/कावि/५३९/२०१८ दि.०३/११/२०१८

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.Ele/HO/A/23/1/2018-19 अन्वये मनपाच्या भाटनगर येथील लिंक रस्त्यावरील विद्युत दाहिनीचे वार्षिक पध्दतीने चालन व देखभाल दुरुस्ती करणेकामी (सन 2018-2019) मे.कल्याणी एंटरप्रायजेस नि.र.रू.39,95,340/- (अक्षरी र.रु.एकोणचाळीस लाख पंच्याण्णव हजार तीनशे चाळीस फक्त) पेक्षा 21.5% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.31,36,342/- पर्यंत काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६३२ विषय क्रमांक - २४
दिनांक – १३/११/२०१८ विभाग – ड क्षेत्रीय
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.सहा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.डक्षे/३/कावि/ /२०१८ दि. /१०/२०१८

विषय - मे.डी.एस. कुलकर्णी, पिंपरी यांचे औष्णीक धुरीकरण करीता टेंम्पो रिक्षा भाड्याने घेणेचे कामासाठी मुदतवाढ मिळणेबाबत.

विषय क्र.२४ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६३३ विषय क्रमांक - २५
दिनांक – १३/११/२०१८ विभाग – ड क्षेत्रीय
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचेकडील पत्र क्र.डक्षेका/३/कावि/७८६/२०१८ दि.०२/११/२०१८

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ड क्षेत्रीय कार्यालयाकडील विद्युत विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र अ मधील (1 ते 6) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६३४ विषय क्रमांक - २६
दिनांक – १३/११/२०१८ विभाग – नगररचना व विकास
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि/१३/११७/२०१८ दि.०३/११/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मौजे दिघी ते मौजे कळस येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास आराखड्या बाहेरील बोपखेल फाटा ते दिघी जकात नाका ६०.० मी. रुंद रस्त्याकरीता खाजगी जमिनीचे भूसंपादन/ खाजगी वाटाघाटीने ताबा घेणेकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास (त्यामध्ये भूसंपादन विशेष अधिकारी कळवतील ती नुकसान भरपाई रक्कम) तसेच त्यासाठी आवश्यक ते सर्वेक्षण, मोजणी करणे, इ.अनुषंगिक मंजूरीसह येणा-या सर्व खर्चास तसेच खाजगी वाटाघाटीकामी येणारे मुल्यांकन, मुद्रांक शुल्क, नोंदणी फी, वकील फी व इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६३५ विषय क्रमांक - २७
दिनांक – १३/११/२०१८ विभाग – मुख्य लेखा परिक्षण
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचेकडील पत्र क्र.मुलेप/६/कावि/१७३/२०१८ दि.०५/११/२०१८

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील

दि.२२.१०.२०१८ ते दि.२८.१०.२०१८ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१७३/२०१८ दि.०५/११/२०१८ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६३६ विषय क्रमांक - २८
दिनांक – १३/११/२०१८ विभाग – जलनि:सारण मुख्यालय
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचेकडील पत्र क्र.जनि/२/कावि/१८४७/२०१८ दि.०५/११/२०१८

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.3/75/2018-19 अन्वये ड क्षेत्रीय कार्यालयातील प्रभाग क्र.२९मधील ड्रेनेज लाईन व चेंबर्सची वार्षिक ठेकेदारी पध्दतीने देखभाल व दुरुस्ती करणेकामी मे.राहूल कन्स्ट्रक्शन नि.र.रू.29,99,974/- (अक्षरी र.रु.एकोणतीस लाख नव्याण्णव हजार नऊशे चौ-याहत्तर फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.29,99,868/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार विषयांकित काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.29,99,868/- पेक्षा 20% कमी म्हणजेच र.रु.23,99,894/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.106/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु. 0/- = एकुण र.रु.24,00,000/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६३७ विषय क्रमांक - २९
दिनांक – १३/११/२०१८ विभाग – जलनि:सारण मुख्यालय
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.जनि/२/कावि/१८४६/२०१८ दि.०५/११/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.3/92/2018-19 अन्वये चिंचवड मैलाशुध्दीकरण केंद्राअंतर्गत प्रभाग क्र.१० मधील संभाजीनगर, शाहुनगर परिसरात व इतर

ठिकाणी आवश्यकतेनुसार जलनिःसारण नलिका टाकणे व जलनि:सारण विषयक सुधारणा कामे करणेकामी मे. पी.एन नागणे नि.र.रू.59,99,997/- (अक्षरी र.रु.एकोणसाठ लाख नव्याण्णव हजार नऊशे सत्यानण्णव फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.59,99,938/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.59,99,938/- पेक्षा 22.33% कमी म्हणजेच र.रु.46,60,152/- +रॉयल्टी चार्जेस र.रु.59/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.46,60,211/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६३८ विषय क्रमांक - ३०

दिनांक – १३/११/२०१८ विभाग – इ क्षेत्रीय, प्रशासन

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/११४९/२०१८ दि.२४/१०/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

प्रशासकिय व कार्यालयीन कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने सर्व प्रेक्षागृहे यांचे कामकाज स्वतंत्रपणे न ठेवता भौगोलिक क्षेत्रानुसार तेथील क्षेत्रीय अधिका-यांच्या नियंत्रणाखाली देणे आवश्यक असल्याने आदेश क्र.प्रशा/२/कावि/७१७/२०१७ दि.२९/०९/२०१७ अन्वये इ क्षेत्रीय कार्यालयाकडे वर्ग करण्यात आलेले असून तेथील कर्मचा-यांचे आस्थापना व वेतन विषयक कामकाज हे इ क्षेत्रीय कार्यालयामार्फत करण्यात येत आहे. उपरोक्त आदेशानुसार व पत्र क्रं.प्रशा/२/कावि/१०५/२०१८ दि.०५/०४/१८ अन्वये कै.अंकुशराव लांडगे नाटयगृह भोसरी-३९ येथील सन २०१८-२०१९ साठी महसुली जमा व महसुली खर्च याबाबत अंदाजपत्रकात केलेल्या तरतूदी या इ क्षेत्रीय कार्यालय प्रशासन अंदाजपत्रकात लेखाशिर्षासह वर्ग करणे आवश्यक आहे. सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील कै.अंकुशराव लांडगे नाटयगृह भोसरी-३९ लेखाशिर्ष ६ जमा र.रू.६०,००,०००/- लेखाशिर्ष -१६ खर्च र.रू. ६८,१५,०००/- लेखाशिर्षावर वर्गीकरण करावे लागेल. वरीलप्रमाणे क्षेत्रिय अधिकारी इ क्षेत्रिय कार्यालय यांना प्रस्तावित केलेनुसार सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील कै.अंकुशराव लांडगे नाटयगृह भोसरी-३९ लेखाशिर्ष ६ जमा र.रू.६०,००,०००/- लेखाशिर्ष-१६ खर्च र.रू.६८,१५,०००/- या रक्कमा व लेखाशिर्ष इ क्षेत्रिय कार्यालयाकडे प्रस्तावात

नमूद प्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिकासभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिकासभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६३९ विषय क्रमांक - ३१
दिनांक – १३/११/२०१८ विभाग – स्थापत्य मुख्यालय
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/नि/फ-मुख्य/६५२/२०१८ दि.५/११/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.10-3-2018-2019 अन्वये बोपखेल फाटा ते आळंदी रस्त्यावर बस स्टेशन बांधणेकामी मे.कृष्णाई इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. नि.र.रू.8,31,13,408/- (अक्षरी र.रु.आठ कोटी एकतीस लाख तेरा हजार चारशे आठ फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.8,21,74,189/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.8,21,74,189/- पेक्षा 2.10% कमी म्हणजेच र.रु.8,04,48,531/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.4,86,219/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.4,53,000/- = एकुण र.रु.8,13,87,750/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६४० विषय क्रमांक - ३२
दिनांक – १३/११/२०१८ विभाग – ब क्षेत्रीय
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.बक्षेका/४/कावि/७००/२०१८ दि.३/११/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

उपसंचालक, नगररचना व विकास विभाग यांनी ठरवुन दिलेल्या प्रतिमहा भाडे प्रति ओटा दर र.रु.२३.५० प्रती चौ.फुट या मध्ये १२.५%वाढ करुन प्रत्येक ओटयाचे क्षेत्रफळ ३८.२४ चौरस फुटांचे ११ महिन्यांचे भाडे र.रु.११,१५०/-, GST(१८%) र.रु.२००४/- व चार महिन्यांचे भाडे

रक्कम अनामत र.रु.४०५२/- असे एकूण र.रु.१७,२१०/- त्यानुसार दोन ओटा धारकांचे र.रु.३४,४२०/-ब क्षेत्रीय कोषागरात भरुन घेण्यात आले आहे.करारनामा करुन चिंचवड भाजी मंडई आवारातील चिंचवड मच्छी मार्केट मधील मोकळा ओटा छप्पर नसलेले ,पोटमाळा नसलेले ओटा क्र.१२ व १३ करारनामा करुन ११ महिन्याकरीता भाड्याने देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६४१ विषय क्रमांक - ३३

दिनांक – १३/११/२०१८ विभाग – स्थापत्य ड मुख्यालय

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचेकडील पत्र क्र.स्था/नि/ड-मुख्य/४४४/२०१८ दि.०५/११/२०१८

विषय - प्रभाग क्र.२३ मधील पाण्याची टाकी कैलासनगर, समता कॉलनी, शिवशंभो कॉलनी, मोहटादेवी मंदिर व प्रभागातील इतर परीसातील रस्त्यांचे डांबरीकरण करणेबाबत.

विषय क्र.३३ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करून घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ३६४२ विषय क्रमांक - ३४

दिनांक – १३/११/२०१८ विभाग – जलनि:सारण

सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचेकडील पत्र क्र.जनि/२/कावि/१८५५/२०१८ दि.१३/११/२०१८

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ मधील निविदा कामांचे अवलोकन होवुन नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलमानुसार भाववाढ देय असल्यास मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६४३ विषय क्रमांक - ३५

दिनांक – १३/११/२०१८

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.विलास मडिगेरी, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव -

मा.स्थायी समिती ठराव क्र.३२३६ दि.२५/०९/२०१८ अन्वये ग क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील स्थापत्य विभागांतर्गत प्रस्तावात नमूद विकास कामे करणेसाठी निविदा पुर्व व निविदा पश्चात आर्किटेक्ट व प्रकल्प सल्लागार नेमणेस व त्यांना अदा करावयाच्या फी च्या खर्चास मान्यता देणेत आलेली आहे तरी सदर प्रस्तावातील अ.क्र.७ च्या कामांसाठी प्रक्लप सल्लगार मे.एक्सेलटेक कन्सल्टिंग सर्व्हिसेस ऐवजी मे.एक्सेलटेक कन्सल्टन्सी एंड प्रोजेक्टस प्रा.लि. अशी दुरूस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६४४ विषय क्रमांक - ३६

दिनांक – १३/११/२०१८

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.सागर आंगोळकर, मा.विकास डोळस यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने दि.२६/११/२०१८ रोजी संविधान दिना निमित्त विविध प्रबोधनात्मक कार्यक्रम, संविधान शाहिरी जलसा, विविध स्पर्धा इ. चे आयोजन पिंपरी येथे करणेस तसेच याअंतर्गत संबंधितांचे मानधन, कार्यक्रम प्रसिध्दी बॅनर, फ्लेक्स, मान्यवर चाहपान, भोजन व्यवस्था इ. साठी थेट पध्दतीने येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६४५ विषय क्रमांक - ३७

दिनांक – १३/११/२०१८

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.विलास मडिगेरी, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव -

मा.स्थायी समिती ठराव क्र.३१०२ दि.२९/०८/२०१८ मध्ये खालील प्रमाणे दुरूस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे. "दुर्गमहर्षी श्रीप्रमोद मांडे यांचे गडकिल्ले महाराष्ट्राचे हे पुस्तक पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व वाचनालये/ ग्रंथालये तसेच मनपा माध्यमिक

शाळांकरिता प्रत्येक २ पुस्तके मराठी देशा फांऊंडेशन, वाकड पुणे" या ऐवजी "दुर्गमहर्षी श्री.प्रमोद मांडे यांचे गडकिल्ले महाराष्ट्राचे हे पुस्तक पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व वाचनालये/ ग्रंथालये तसेच मनपा प्राथमिक व माध्यमिक शाळांकरिता प्रत्येक २ पुस्तके मराठी देशा फांऊंडेशन, वाकड पुणे" असा मजकूर समाविष्ट करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६४६ विषय क्रमांक - ३८

दिनांक – १३/११/२०१८

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.विलास मडिगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव -

मा.स्थायी समिती ठराव क्र.३५५८ दि.३०/१०/२०१८ मध्ये खालील प्रमाणे दुरूस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे. "प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहातील कॅन्टीन जोशी बंधु केटरर्स चिंचवड यांचे ऐवजी युनिक केटरर्स, चिंचवड संस्थेला उपसंचालक नगररचना ठरवतील त्या भाडे दराने ११ महिने कालावधीसाठी भाडेकराराने देणेस मान्यता देणेत येत आहे". सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६४७ विषय क्रमांक - ३९

दिनांक – १३/११/२०१८

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.विलास मडिगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव –

मा.स्थायी समिती ठराव क्र.३६०१ दि.०५/११/२०१८ रद्द करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६४८ विषय क्रमांक - ४०

दिनांक – १३/११/२०१८

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.विलास मडिगेरी, मा.विकास डोळस यांचा प्रस्ताव -

दि.२०/११/२०१८ रोजी मा.महापालिका सभा असल्याने दि.२०/११/२०१८ ची मा.स्थायी समितीची सभा दि.२२/११/२०१८ रोजी दुपारी २.०० वा. आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले

**(ममता विनायक गायकवाड)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक- नस/३/कावि/१४५१/२०१८
दिनांक - १३/११/२०१८

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(क्र.वि.मुका/५/कावि/५२१/२०१८ दि.०१/११/२०१८ विषय क्र.१८ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी१८
विद्युत विभाग
प्रपत्र - अ

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारीख | कामाचा आदेश क्रमांक | कामाच्या आदेशाची तारीख | निविदा रक्कम | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मे. मिहीर एंटरप्रायजेस | 4/1-2018-19 | क प्रभागांतर्गत रस्तारुंदीकरण व विविध प्रकल्पांच्या कामास अडथळा ठरणारे म.रा.वि.वि. मंडळाचे फीडर, उच्चदाब लघुदाब पोल व तारा हलविणे. (स्केटींग मैदान) | 28/06/2018 | विमुका/5/कावि/ 245/2018 | दि. 27/06/2018 | 1375864 | 17.1 % कमी | 1140591 | + GST ~~सह~~ वगळा |
| | | | | | | Total | 1375864 | | 1140591 | |

सहशहर अभियंता(वि/यां)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८

(क्र.डक्षेका / ३ / कावि / ७८६ / २०१८ दि.०२ / ११ / २०१८ विषय क्र.२५ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड क्षेत्रीय कार्यालय, रहाटणी -17

(विषयपत्र क्र.डक्षेका/3/कावि/786/2018 दि.02/11/2018 लगत)

प्रपत्र " अ "

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेची तारीख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेश दिनांक | निविदा रक्कम | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मे. व्ही. एस. एंटरप्रायेजस | विद्युत/ड प्रभाग/Prabhag/4/1/2018-2019 | ड प्रभाग अंर्तगत प्रभाग क्र. २५ मधील पुनावळे, ताथवडे व इतर परिसरातील स्ट्रीटलाईटची देखभाल दुरूस्ती व अनुषंगिक कामे करणे. | 29/09/2018 | डक्षेका/03/कावि/723/2018 | 19/10/2018 | 892034 | -19.00 % कमी | 722548 |
| 2 | मे. व्ही. एस. एंटरप्रायेजस | विद्युत/ड प्रभाग/Prabhag/4/2/2018-2019 | ड प्रभाग अंर्तगत प्रभाग क्र. २५ मधील वाकड व इतर परिसरातील स्ट्रीटलाईटची देखभाल दुरूस्ती व अनुषंगिक कामे करणे. | 29/09/2018 | डक्षेका/03/कावि/724/2018 | 19/10/2018 | 892384 | -24.78 % कमी | 671251 |
| 3 | मे. सनशाईन इलेक्ट्रीकल | विद्युत/ड प्रभाग/Prabhag/4/4/2018-2019 | ड प्रभाग अंर्तगत प्रभाग क्र. २८ मधील रहाटणी गावठाण लगत व इतर परिसरातील स्ट्रीटलाईटची देखभाल दुरूस्ती व अनुषंगिक कामे करणे. | 29/09/2018 | डक्षेका/03/कावि/726/2018 | 22/10/2018 | 891537 | -17.82% कमी | 732665 |
| 4 | मे. प्रविण इलेक्ट्रीकल सर्विसेस | विद्युत/ड प्रभाग/Prabhag/4/9/2018-2019 | ड प्रभाग अंर्तगत प्रभाग क्र. २९ मधील पिंपळे गुरव व इतर परिसरातील स्ट्रीटलाईटची देखभाल दुरूस्ती व अनुषंगिक कामे करणे. | 29/09/2018 | डक्षेका/03/कावि/727/2018 | 22/10/2018 | 891887 | -16.92% कमी | 740980 |
| 5 | मे. प्रविण इलेक्ट्रीकल सर्विसेस | विद्युत/ड प्रभाग/Prabhag/4/13/2018-2019 | ड प्रभाग अंर्तगत प्रभाग क्र. २६ मधील पिंपळे निलख गावठाण व इतर परिसरातील स्ट्रीटलाईटची देखभाल दुरूस्ती व अनुषंगिक कामे करणे. | 29/09/2018 | डक्षेका/03/कावि/728/2018 | 22/10/2018 | 891546 | -16.62% कमी | 743371 |
| 6 | मे. दिग्विजय इलेक्ट्रीक्लस | विद्युत/ड प्रभाग/Prabhag/8/10/2018-2019 | ड प्रभाग अंतर्गत वाकड उपविभागातील प्रभाग क्र. २८ मधील फिडर पीलर व जंक्शन बॉक्सची आवश्यक देखभाल दुरूस्ती व अनुषंगिक कामे करणे. | 04/10/2018 | डक्षेका/03/कावि/725/2018 | 22/10/2018 | 892091 | -15.00% कमी | 758277 |
| | एकुण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | 4369092 |

D:\Shri Ghadge IMP Data\Ganesh\□□□□□ □□□□□\8-11-18-19\Docket Elec\Nagarsachiv Docet - Elec 1.doc

2

कार्यकारी अभियंता (विद्युत)
ड क्षेत्रिय कार्यालय,

(क्र.जनि/२/कावि/१८५५/२०१८ दि.१३/११/२०१८ विषय क्र.३४ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी१८
जलनिसारण विभाग
पत्र क्र जनि/२/कावि/१८५५/18
दिनांक १३/11/2018

प्रपत्र - अ (पान क्र. १ )

जलनिसारण विभाग

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारीख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशची तारीख | निविदा रक्कम | स्विकृत दर (कमी) | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | M/S SANKALP INFRASTRUCTURE | 21/10/2017-18 | कासारवाडी मलशुद्धीकरण केंद्रांतर्गत प्रभाग क्र.३१ दिघी मध्ये मलनिःसारण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणे. | 03-03-2018 | जनि/२/कावि/१००६/१८ | 20-04-2018 | 14,98,406 | 21.00 | 11,83,741 |

कार्यकारी अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८